पुणे महानगरपालिका

*** स्थायी समिती ***

**कार्यपत्रिका क्रमांक ३६**

स्थायी समितीची साप्ताहिक सभा **मंगळवार दि. २६/११/२०१९** रोजी सकाळी ११:३० (साडे अकरा) वाजता **स्थायी समिती सभागृह, दुसरा मजला, पुणे महानगरपालिकेची नवीन विस्तारीत इमारत येथे भरेल.**

सदर सभेत खालील विषयांचा विचार होईल.

**वृत्तांत कायम करणे.**

**उप आयुक्त, विभागीय कार्यालय यांचे कामकाजाचा आढावा**

**विषय क्र. १५८८**

क्षेत्रिय आयुक्त, परिमंडळ क्र. २ कार्यालय अधिनस्त औंध–बाणेर, शिवाजीनगर–घोलेरोड व कोथरुड–बावधन क्षेत्रिय कार्यालयांच्या माहे ऑक्टोंबर २०१९ चा मासिक अहवाल निदर्शनास आणणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/क्षेआप२/७२० दि.१८/११/२०१९ चे पत्र.

**विषय क्र. १५८९**

सह महापालिका आयुक्त, (परिमंडळ विभाग क्र. ४) कार्यालयाचे नियंत्रणाखालील हडपसर–मुंढवा, वानवडी–रामटेकडी, कोंढवा–येवलेवाडी महापालिका सहाय्यक आयुक्त कार्यालयांकडील माहे ऑक्टोंबर २०१९ चा मासिक अहवाल निदर्शनास आणणेबाबत मा.सह महापालिका आयुक्त, परिमंडळ क्र. ४ यांचे जा.क्र. सह/मआ–४/३२३५ दि.१६/११/२०१९ चे पत्र.

**मा.सभासदांचे प्रस्ताव**

**विषय क्र. १५९०**

मा.ॲड्.अविनाश साळवे यांचे दि. २०/११/२०१९ चे पत्र.

पुणे शहरातील पुणे महानगरपालिका हददीमध्ये मध्यमवर्गीय कुटुंबाची व तसेच सध्या आर्थिक मंदी संख्या मोठया प्रमाणात आहे. यातील बहुसंख्य लोकांच्या मिळकतीची आकारणी ३ पट दराने करण्यात आली आहे. ३ पट आकारणी मुळे मिळकत कराची रक्कम मोठया प्रमाणावर असल्याने मिळकतकर थकबाकीचे प्रमाण वाढत आहे. सदर थकबाकीवर दरमहा २% दराने दंडाची आकारणी होत असल्याने थकबाकीची रक्कम मोठया प्रमाणावर असल्याचे दिसून येते. तसेच सन २०१९ मध्ये पुणे शहरात मोठया प्रमाणावर पाऊस झाल्याने पुणे शहरातील नदया,नाले, ओढे यांना ब–याच वेळा मोठया प्रमाणात पूर आलेला आहे. अनेक झोपडपट्‌या, इमारती, दुकाने या मध्ये पुराचे पाणी गेल्याने नागरिकांचे मोठया प्रमाणावर आर्थिक नुकसान झाले असून मोठया प्रमाणावर जीवितहानी देखील झालेली आहे.

वरील वस्तुस्थितीचा गांभीर्याने विचार करून थकीत मिळकतकर वसुलीसाठी अभय योजना राबविल्यास नागरिकांना नैसर्गिक न्याय मिळून मोठया प्रमाणावर थकीत मिळकतकर वसूल होऊन पुणे महानगरपालिकेचेही आर्थिक उत्पन्न वाढण्यास मदत होईल.

तरी निवासी व बिगर निवासी थकीत मिळकतकर वसुलीकरिता सन २०१९ मध्ये त्वरीत अभय योजना राबविण्यात यावी.

**माहितीसाठी आलेले विषय**

**विषय क्र. १५९१**

क्षेत्रिय आयुक्त, परिमंडळ क्र. २ कार्यालय अधिनस्त औंध–बाणेर, शिवाजीनगर–घोलेरोड व कोथरुड–बावधन क्षेत्रिय कार्यालयांकडील दि.१/१०/२०१९ ते ३१/१०/२०१९ अखेर महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(ड) नुसार मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे विषयपत्रासोबत जोडल्याप्रमाणे संविदा करार व तद्नुषंगिक माहिती निदर्शनास आणणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/क्षेआप २/७०७ दि.१६/११/२०१९ चे पत्र.

**मागील सभेचे विषय**

**विषय क्र. १५९२**

पुणे शहरातील पुलांवर नवीन प्रकाश व्यवस्था करणे व सुशोभिकरण करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति. महापालिका आयुक्त (वि) यांचे जा. क्र.मआ/विद्युत/५४८ दि.११/९/२०१९ चे पत्र.

(टिप : सदर विषयाचा विचार १५ दिवसांनी करावा असे दि. ७/११/२०१९ च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. १५९३**

पुणे महानगर परिवहन महामंडळाकडील मा.संचालक मंडळ सभा क्र. ५ दि.६/३/२०१९ वित्तीय वर्ष २०१९-२० मधील मा.संचालक मंडळ सभा क्र. १ दि.३/७/२०१९, मा.संचालक मंडळ सभा क्र. २ दि.१८/७/२०१९ व मा.संचालक मंडळ सभा क्र. ३ दि.७/९/२०१९ रोजीच्या सभेचा वृत्तांत मा.स्थायी समितीमार्फत मा.मुख्य सभेच्या अवलोकनार्थ सादर करणेबाबत मा.कंपनी सेक्रेटरी आणि विधी अधिकारी, पुणे महानगर परिवहन महामंडळ लि. यांचे जा.क्र. पीएमपीएमएल/सीएसअ‍ॅण्ड एलओ/३९४४ दि.१७/१०/२०१९ चे पत्र.
(टिप : सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा असे दि. १९/११/२०१९ च्या सभेत ठरले होते.)

## संकिर्ण

**विषय क्र. १५९४**

सन २०१९-२० च्या पुणे महानगरपालिकेच्या अर्थसंकल्पात CE22A680 ह्या अर्थशिर्षका अंतर्गत हज हाऊस बांधणे या कामाची र.रुपये ११७.५० लक्ष तरतूद प्रभाग क्र. २७ कोंढवा खुर्द स.नं. ४७/१ येथील पुणे मनपाच्या ताब्यात असलेल्या अ‍ॅमिनिटी स्पेसच्या जागेवर हज हाऊसच्या कामासाठीची तरतूद त्याच जागेवर सिव्हीक कल्चरल अ‍ॅण्ड कम्युनिटी सेंटर बांधणे या सद्यस्थितीत चालू असलेल्या कामासाठी वापरणेस मान्यता मिळणेबाबत मा.प्र.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/प्रकल्प/७०१ दि.१४/११/२०१९ चे पत्र.

**नगरसचिव,**
**पुणे महानगरपालिका.**

**(टिप :- प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयांची कागदपत्रे (डॉकेटस) नगरसचिव यांच्या कार्यालयात वाचण्यासाठी ठेवली आहेत.)**